# जाहिरात

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

### जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी
### जिल्हा शल्यचिकित्सक, के.टी.एस. सामान्य रुग्णालय, गोंदिया

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत गोंदिया जिल्ह्याकरिता कोरोना विषाणु (कोवीड-१९) चा प्रादुर्भाव लक्षात घेता उद्रेक सदृश्य परिस्थिती हाताळण्यासाठी खालील तक्त्यामध्ये दर्शविल्या प्रमाणे कंत्राटी/करार पध्दतीने मानधन तत्वावर खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडुन online अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | पदसंख्या | कमाल वयोमर्यादा | शैक्षणिक अर्हता | एकत्रीत मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | २९ | ६० वर्ष | MBBS MMC Registration : | ६०००० |
| २ | वैद्यकीय अधिकारी | १९ | ६० वर्ष | BAMS/BUMS/BDS MMC Registration | २८००० |
| ३ | ई.सी.जी. टेक्निशियन | ४ | ६० वर्ष | B.Sc. with Physics/Chemistry/Biology and Experience of ECG Technician at least one year | १७००० |
| ४ | एक्स-रे टेक्निशियन | ५ | ६० वर्ष | Retired X - ray Technician | १७००० |
| | एकूण | ५७ | | | |

**सर्वसाधारण अटी व शर्ती**

१) फक्त Online पध्दतीनेच अर्ज स्वीकारण्यात येतील. Online पध्दतीने अर्ज भरणेकरीता www.zpgondia.gov.in या सकेंतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

२) सदर अर्ज भरणेकरीता उमेदवाराने स्वतःचा Gmail Account तयार करुन घेणे आवश्यक राहील.

३) Online अर्ज भरण्याचा कालावधी दि.१८/०९/२०२० (सकाळी १०.३० वाजता पासून ते २२/०९/२०२० (रात्री १२.०० वाजेपर्यंत) राहील.

४) प्राप्त अर्जाची यादी प्रकाशीत करणे (गुणाकंणासह) दि.२४/०९/२०२० सकाळी ११.०० वाजता.

५) आक्षेप मागविण्याचा कालावधी दिनांक २५/०९/२०२० रात्री १२.०० वाजे पर्यंत.

६) आक्षेप निराकरण करण्याकरिताचा कालावधी दिनांक २७/०९/२०२०.

७) अंतीम यादी प्रकाशीत करण्याचा दिनांक २८/०९/२०२०.

८) गरजेपक्षा जास्त उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यास मेरीट लीस्ट नुसार १:३ उमेदवारांना कागदपत्र पडताळणी करीता बोलाविण्यासाठी पदनिहाय वेळापत्रक वेबसाईटवर नंतर प्रकाशीत करण्यात येईल. इतर उमेदवारांना विचारात घेण्यात येणार नाही तथापी प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची यादी ही जिल्हा परिषद च्या संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात येईल.

९) पदनिहाय १:३ उमेदवारांच्या अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राची पडताळणी केल्यानंतर अंतिम निवड यादी प्रकाशीत करण्यात येईल.

Scanned with CamScanner

१०) एम.बी.बी.एस. अर्हता धारक उमेदवार पुरेशे प्रमाणात न मिळाल्यास सदर पदाकरीता बी.ए.एम.एस., बी.यु.एम.एस. आणि बी.डी.एस. अर्हता धारक उमेदवारांचा विचार केला जाईल व त्या उमेदवारास बी.ए.एम.एस. करीता असलेले मानधन देय राहिल.

११) अंतिम निवड यादी प्रसिध्द केल्यानंतर दुसऱ्या दिवशी नियुक्ती आदेश देण्यात येईल.

१२) उमेदवाराची निवड झाल्यास त्यास कोविड-१९ साठी नेमणुक देण्यात येणार असुन त्यांची नेमणुक ही कोविड १९ साथ कालावधीपुरतीच राहणार असुन सदर साथ कमी झाल्यास किंवा रुग्णालयातील कोविड-१९ उपचार कक्ष बंद झाल्यास सदरील नेमणुक आपोआप संपृष्टात येईल. त्यासाठी १ महिन्याची नोटीस दिली जाणार नाही.

१३) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रीत मानधन असुन त्या व्यतिरीक्त ईतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

१४) राष्ट्रिय आरोग्य अभियानाच्या कर्मचाऱ्यासाठी असणारे करारपत्र भरुन देणे बंधनकारक राहील.

१५) Online प्राप्त झालेल्या अर्जावरुन व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. मेरीट लिस्ट तयार करतांना Qualifying Exam मध्ये मिळालेले गुण + उच्च शैक्षणिक अर्हता + शासकीय/निमशासकीय कार्यालयाचा अनुभव याबाबींचे गुण एकत्र करुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येऊन सदर मेरीट लीस्ट ही जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर प्रकाशीत करण्यात येईल व संबंधीत पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यात येईल.

१६) कोरोना विषाणु (Covid-19) चा प्रार्दुभाव लक्षता घेता उद्रेक सदृश्य परिस्थिती हाताळण्यासाठी कोविड केअर सेंटर, डेडीकेटेड कोविड हेल्थ सेंटर, डेडीकेटेड कोविड हॉस्पीटल या संस्थामध्ये नियुक्ती करण्यात येईल.

१७) जाहीराती मध्ये नमुद केलेल्या पदांकरिता कमी अर्ज प्राप्त झाल्यास प्रत्येक सोमवारी थेट मुलाखती द्वारे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात मुलाखत घेण्यात येईल.

१८) अर्जदारास मधुमेह / उच्च रक्तदाब / हृदयविकार इत्यादी गंभीर आजार असल्यास संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असल्याबाबतचे सर्टीफिकेट सोबत जोडण्यात यावे.

१९) अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

२०) पुर्ननियुक्तीबाबत, शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

२१) उमेदवार कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना त्यांनी दिलेल्या कार्यक्षेत्रात मुख्यालयी राहून सेवा देणे बंधनकारक राहील.

२२) मुलाखत होणार नसल्याने तसेच संपूर्ण प्रक्रिया ही Online पध्दतीने राबविण्यात येत असल्याने कोणत्याही उमेदवारांनी या कार्यालयात बोलाविल्या शिवाय प्रत्यक्ष भेट देऊ नये.

२३) भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तत्रांचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द करण्यात येईल.

२४) भरती प्रक्रियेचे संपूर्ण अधिकार, पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, इत्यादी सर्व अधिकार या कार्यालयानी राखुन ठेवलेले आहे.

जिल्हा शल्यचिकित्सक
तथा नोडल अधिकारी
(कोविड-१९) गोंदिया

Scanned with CamScanner